# ८ मार्च : मुंबईत कार्यक्रमांची गजबज

१ मे जसा कामगार दिन तसा ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चितपणे प्रस्थापित झाला आहे. इतकेच नव्हे तर त्या दिवसाला चळवळीचा रंगही प्राप्त झाला आहे. केवळ महिला दिन असे स्वरूप त्याला राहिले नसून स्त्री-मुक्ती दिन असे स्वरूप त्याला गेल्या काही वर्षांत आले आहे.

यंदा मुंबईमध्ये ८ मार्चनिमित्त अनेक कार्यक्रम झाले. महाराष्ट्रात तयार झालेल्या संपर्क समितीने जाहीर केल्याप्रमाणे पिण्याचे पाणी, पाळणाघरांची सोय व जागतिक शांतता या तीन मागण्या घेऊन सर्व स्त्री-संघटनांचा मोर्चा निघाला. श्रमिक महिला संघ, वर्किंग वुमेन्स को ऑर्डिनेशन कमिटी, श्रमजिवी महिला सभा, अखिल भारतीय महिला फेडरेशन स्त्री मुक्ती संघटना इ. चा समावेश होता. झोपडपट्टीतून, चाळीतून, कामगारवर्गीय गृहिणी आल्या होत्या. ३००० स्त्रिया उपस्थित होत्या. मात्र कारखान्यात व ऑफिसात काम करणाऱ्या कामगार स्त्रियांची अनुपस्थिती जाणवत होती. पक्षांशी संबंधित नसलेले इतर छोटे स्त्रियांचे गटही या मोर्चात सामील झाले होते. तेवढ्याच मध्यमवर्गीय स्त्रिया मोर्चामध्ये होत्या. विद्यार्थिनी, प्राध्यापिका, शिक्षिका, समाजसेविका, पत्रकार इत्यादी स्त्रियांचा त्यामध्ये समावेश होता. अमेरिकन वकिलातीवर न्यूट्रॉन बॉबच्या निषेधार्थ मोर्चा नेण्यात आला होता. आझाद मैदानावरून मोर्चा निघाला व जुन्या सचिवालया जवळ अडविला गेला. तेथे मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. सभेतील भाषणांमधून तिन्ही मागण्यांचे समर्थन पोचविण्याचा प्रयत्न झाला. स्त्रीमुक्तीची गाणी म्हणून मोर्चा विसर्जित झाला. विधानसभा चालू नसल्याने मोर्चातर्फे सरकारकडे करण्यात येणाऱ्या मागण्यांचे निवेदन ११ मार्च रोजी मुख्यमंत्र्यांना सादर करण्याचे ठरले.

या कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर अनेक मार्गांनी स्त्रियांपर्यंत स्त्रीमुक्तीचा प्रश्न पोचविण्याची गरज इतर अनेक छोटया गटांना वाटली. स्त्री-जागृती कलापथक या गटाने एक सांस्कृतिक कार्यक्रम छबिलदास बॉईज हायस्कूलमध्ये ६ मार्च रोजी घडवून आणला. नृत्य-नाटिकेच्या माध्यमातून भारतातील सर्व प्रांतांतील-भाषांतील गाणी एकत्र जमवून त्यावर खास मणिपुरी नृत्याच्या शैलीतील सामूहिक नृत्य बसवून त्यातून स्त्रीजीवनाचा आलेख सादर केला गेला. राजदरबारी विकसित पावलेले नृत्य जेव्हा सामान्य स्त्री-जीवनाशी एकरूप पावण्याचा प्रयत्न करते तेव्हा त्या मिलाफातून अतिशय प्रभावी अशी कलाकृती बाहेर पडू शकते. ती नुसतीच कलाही रहात नाही आणि तो नुसता प्रचारही होत नाही. त्याचबरोबर शांता गोखले यांनी लिहिलेली नाटिका हिंदीतून सादर करण्यात आली. नवऱ्याची बदली झाल्यावर तो बायकोही आपल्याबरोबर बदलीच्या गावी येणार असे गृहीत धरतो आणि नोकरी करणारी पत्नी जेव्हा असे फरफटत जायला नकार देते तेव्हा उद्भवणारा संघर्ष हृचा नाटिकेत पेश केला होता. आयुष्यातील अशा छोटया छोटया प्रसंगांतून स्त्रियांना आपले समाजातील स्थान दुय्यम असल्याचा प्रत्यय येत असतो आणि स्त्रियांच्या मनात विचारांची ठिणगी पेटते. या कार्यक्रमाला ३०० ते ४०० स्त्री-पुरुष उपस्थित होते, आणि वैशिष्टच म्हणजे ते सर्व भाषिक होते, तसेच सर्व वर्गांतून आलेले होते. फिरते पाळणाघर, आरोग्यसेवेशी संबंधित स्त्रिया यांच्यामध्ये जाऊन या कार्यक्रमाची माहिती दिली होती व तिकीटविक्री केली होती. याच वेळी पोस्टर प्रदर्शनातून ८ मार्चच्या इतिहासाची माहिती देण्यात आली होती. स्त्रीचे घरगुती कामही कसे उत्पादक आहे यासंबंधी माहिती देणारी पोस्टर्स होती. कार्यक्रमाच्या अखेरीस स्त्रियांच्या एकजूटीचे आवाहन केले होते. 'मानवमुक्तीशिवाय स्त्रीमुक्ती नाही' आणि 'स्त्रीमुक्तीशिवाय मानवमुक्ती नाही' अशा घोषणांच्या गजरात कार्यक्रम संपला.

तिसरा कार्यक्रम स्त्री-जागृती समिती या गटाने महाकाली रोडवरील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या स्त्रियांच्या समवेत अंधेरी येथे होली फॅमिली स्कूलच्या हॉलमध्ये साजरा केला. ४-५ सुशिक्षित स्त्रियांचा हा गट गेली तीन वर्षे या परिसरातील स्त्रियांना त्यांच्या

प्रश्नांवर जागृत करण्याचा व संघटित करण्याचा प्रयत्न करीत आहे. दोन आठवड्यांहून जास्त वस्तीवस्तीमध्ये जाऊन ८ मार्च या आंतरराष्ट्रीय कामगार–कष्टकरी महिला दिनाचे महत्त्व स्त्रियांना समजावून दिले होते. ७ मार्च, रविवार रोजी मिरवणूक काढून घोषणा देत सर्व स्त्रिया या शाळेच्या हॉलमध्ये जमल्या. १०० ते १५० स्त्रियांच्या उपस्थितीत गाणी, भाषणे व नाटिका सादर करण्यात आली. ही नाटिका झोपडपट्टीत रहाणाऱ्या स्त्रियांनी स्वतः लिहून स्वतः बसविली होती. गाणी स्त्री-मुक्ती संघटनेच्या स्त्रियांनी गायली व इतर सर्व स्त्रियांनी साथ दिली. स्त्री-जागृती समितीने आपल्या भाषणांमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन हा प्रामुख्याने कष्टकरी महिला दिन म्हणून समाजवादी चळवळीतून जन्माला आला असल्याचे आवर्जून सांगितले.

चौथा कार्यक्रम हा फोरम अगेन्स्ट ऑप्रेशन ऑफ वुमेन–नारी अत्याचार विरोधी मंच–या संस्थेतर्फे झाला. स्त्रियांविषयक चित्रपट महोत्सव ५ ते ११ मार्च या काळात मुंबई येथे दास मिडिया या सस्थेतर्फे आयोजित करण्यात आला होता – त्यासाठी प्रसिद्धी देण्याचे व वेगवेगळ्या स्त्रियांमध्ये माहिती देण्याचे काम फोरमतर्फे करण्यात आले. महाविद्यालये, ऑफिसेस येथे स्त्रियांच्या बैठका घेऊन ८ मार्चची व चित्रपटांची माहिती देण्यात आली. स्त्रियांविषयक चित्रपट या कल्पनेला प्रतिसाद छान मिळत होता. परंतु इंग्लिश सबटायटल्स असल्याचे सांगितल्याबरोबर आपलेपणा संपत होता. एकूण देशोदेशीचे ११ चित्रपट दाखविले गेले. त्यामध्ये भारतीय चित्रपट एकच होता. तसेच आकाशवाणी हे चित्रपटगृही फार दूर होते. अशा तऱ्हेने भाषेचा प्रश्न, चित्रपटांचे एकूण काम्पोझिशन आणि चित्रपटगृहाची निवड या अडचणींमुळे प्रत्यक्ष महोत्सवासाठी कर्मचारी स्त्रियांचा मिळावा तितका प्रतिसाद मिळू शकला नाही. तिकिट–विक्री चांगली झाली, परंतु ते यशाचे गमक मानता येणार नाही. चित्रपट मात्र अतिशय छान होते आणि विविध तऱ्हेने होणारी स्त्रीची पिळवणूक त्यातून व्यक्त होत होती. नव्या स्त्रीचे दर्शन हे चित्रपट घडवीत होते. पोर्ट्रेट ऑफ टेरेसा हा क्यूबातून आलेला चित्रपट अतिशय महत्त्वपूर्ण होता. या महोत्सवाच्या वेळी स्त्रीविषयक वाङ्मयाची विक्री चांगली झाली. फोरमतर्फे पोस्टकार्डे विकण्यात आली, त्यावर स्त्रीविषयक मजकूर सुटसुटीत व आकर्षक सुभाषितांच्या पद्धतीने छापला होता.

पाचवा कार्यक्रम ग्रंथाली व स्त्रीमुक्ती संघटना यांच्या सहकार्याने पार पडला. 'आजची नाटके : घराबाहेर पडू पहाणाऱ्या स्त्रीचे चित्रण' या विषयावर केवळ स्त्रियांसाठी खुली चर्चा आयोजित करण्यात आली होती. १५० स्त्रिया उपस्थित होत्या. 'रुची'चे अंक वेळेवर न पिळाल्याने अनेकांपर्यंत ही माहिती पोच शकली नाही. पुष्पा भावे यांनी चर्चेला मार्गदर्शन केले. सावित्री नाटकात काम करणाऱ्या नीरा आडारकर, नीना जोशी, व लालन सारंग आणि चित्रा पालेकर या रंगभूमीवरील कलाकार तेथे उपस्थित होत्या. आलेल्या स्त्रियांनीही अतिशय मोकळेपणी चर्चेत भाग घेऊन छान दाद दिली. ह्या अभिनव कार्यक्रमाने मध्यमवर्गीयांमध्ये जाग्या होऊ पाहणाऱ्या स्त्रीमुक्तीच्या भावनेला सुंदर आविष्कार दिला.

अशा तऱ्हेने वेगवेगळ्या विभागातील स्त्रियांमधून स्त्री-मुक्तीची आकांक्षा मार्चच्या आंतरराष्ट्रीय दिनाच्या निमित्ताने व्यक्त झाली, हे यंदाचे वैशिष्ट्य सांगता येईल. एका अर्थाने ही कौतुकाची गोष्ट आहे की, वेगवेगळ्या विभागांतील स्त्रिया अन्यायाविरुद्ध बोलू इच्छितात, उठू इच्छितात. दुसऱ्या अर्थाने असे म्हणता येईल की, अजूनही वेगवेगळ्या स्त्रियांमध्ये बरेच अंतर आहे. त्या वेगवेगळ्या वर्गांमध्ये विभागलेल्या आहेत आणि वर्गबंधनांच्या बाहेर येऊन आपल्यावरील अन्यायाचे स्वरूप एकच कसे आहे हे त्या ओळखू शकत नाहीत. मध्यमवर्गीय स्त्रीला कदाचित पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आज पडत नसेल आणि त्यामुळे या मागणीवर तिच्या भावना खडबडून जाग्या होत नसतील, पण ती स्त्री असल्यामुळे तिला घराबाहेर पडल्यावरही घरचे काम उचलावे लागते आणि अशा रीतीने सतत कामाच्या ओझ्याखाली व्यक्तिमत्त्व–विकास साधता येत नाही, हा कष्टकरी व मध्यमवर्गीय स्त्रीचा सारखाच अनुभव आहे. ह्या पैलूवर कोणत्याच कार्यक्रमामध्ये भर नव्हता, एरवी ज्या त्या विभागातील स्त्रिया आपापले प्रश्न घेऊन उठत रहातीलच. पण ८ मार्च हा तरी स्त्रियांमध्ये बहीणभाव निर्माण करण्यासाठी वापरला जावा असे वाटते. अर्थात तातडतोबीने सर्व विभागांतील स्त्रिया एकत्र येणे कठीण आहे. परंतु त्यांच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तरी याची चर्चा व्हावी असे वाटते.

– छाया दातार